(आस्थापना (प्रशासन शाखा)

(441)

जा.क्र./झोपुप्रा/सनि/ ५७अ /२०२३
दिनांक:- ०६/०१/२०२३

# परिपत्रक क्र. ०१ /२०२३

**विषय :- सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी मुदतीत करण्याची काळजी घेणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी पुनर्वसन योजना पुर्ण होण्याच्या अंतिम टप्यात झोपडपट्टी धारकांना सदनिकांचे वितरण करते वेळी किंवा त्याही नंतर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी विलंबाने होत असल्यामुळे झोपडपट्टी धारकांशी योजनेबाबत चर्चा,समन्वय या अनुषंगाने गृहनिर्माण संस्थेचे व्यासपीठ उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होत आहेत. प्राधिकरणासाठी लागु असलेल्या विशेष नियमावली २०१४ मधील तरतुदी विचारात घेता झोपडपट्टी धारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था शक्यतो अधिनियमातील कलम ३(क) च्या अधिसूचनेनंतर तात्काळ नोंदणी करणे आवश्यक आहे .

झोपडपट्टी धारकांच्या सुचना व हरकती विचारात घेवून योजना विना अडथळा मुदतीमध्ये पूर्ण व्हावी यासाठी पात्र झोपडीधारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झाली असणेची बाब आवश्यक असल्यामुळे या संदर्भात खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित झाल्यानंतर आणि प्राधिकरणाचे सक्षम प्राधिकारी यांनी झोपडपट्टी धारकांची पात्रता यादी (परिशिष्ट-२) मध्ये प्रसिध्द केल्यानंतर पुनर्वसन क्षेत्रातील संबंधित पात्र झोपडपट्टी धारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था सहाय्यक निबंधक,झोपुप्रा, पुणे यांचेकडे नोंदणीकृत करण्यात यावी अशी बाब अनिवार्य करण्यात येत आहे.

२) झोपडपट्टीच्या मुळ ठिकाणावर (In-Situ) पुनर्वसन शक्य नसेल अशा प्रकरणी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करते वेळी उपरोक्त १ मधील बाबींची पूर्तता होत असल्याची

तसेच योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाल्याची खात्री झाल्यानंतरच नोंदणी प्रक्रिया पार पाडावी.

३) विकसकांनी व प्राधिकरण कार्यालयाने योजनेसंदर्भातील पार पाडण्यात येणारे सर्व महत्त्वाचे टप्पे आणि सांविधानिक कार्यवाही सहकारी गृहनिर्माण संस्थेस अवगत करावी,तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेसोबत समन्वय ठेवावा.

वरील कार्यालयीन परिपत्रकातील सुचनांची सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपुप्रा,पुणे
6.1.23

प्रत :-

१) सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
२) सहाय्यक संचालक नगररचना,तांत्रिक विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
३) उपसंचालक, लेखा विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
४) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
५) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
६) उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
७) तहसीलदार, ताबा विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.
८) संगणक अधिकारी, संगणक विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे.

# शुदधीपत्रक

**परिपत्रक क्र.३५/२०२१**

जा.क्र./झोपुप्रा/सनि/२०२२/M-२३५
दिनांक२४/०६/२०२२

या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३५/२०२१,दिनांक०७/०४/२०२१ मधील ब) (१) मधील सदनिका/गाळा हस्तांतरण दस्तऐवज नोंदणीकृत करुन घेणे अनिवार्य असुन सदर नोंदणीसाठी आकारल्या जाणा-या रेडीरेकनर किंमतीवर आधारीत मुद्रांक शुल्क ची येणारी रक्कम आणि सदनिका,वाणिज्यिक गाळयाकरीता आकारणी रक्कम प्रचलीत रेडी रेकनरच्या १०% दराने पुनर्वसन सदनिकेच्या/गाळयाच्या प्रत्योक हस्तांतरणासाठी हस्तांतरण शुल्क म्हणुन जमा करणे आवश्यक राहील या तरतुदीऐवजी "**सदनिका/गाळा हस्तांतरण दस्तऐवज नोंदणीकृत करुन घेणे अनिवार्य असुन सदर नोंदणीसाठी आकारल्या जाणा-या रेडीरेकनर किंमतीवर आधारीत मुद्रांक शुल्क ची येणारी रक्कम आणि सदनिका,वाणिज्यिक गाळयाकरीता आकारणी रक्कम प्रचलीत रेडी रेकनरच्या २५ % दराने पुनर्वसन सदनिकेच्या/गाळयाच्या प्रत्योक हस्तांतरणासाठी हस्तांतरण शुल्क म्हणुन जमा करणे आवश्यक राहील**," असे वाचण्यात यावे.

परिपत्रकातील इतर मजकुरामध्ये कुठलाही बदल नाही.

22.6.2022

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झो.पु.प्रा.पुणे